जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्रमांक - ४३४ दिनांक - १६/०६/२०२३

### पीसीबी,गुन्हे शाखा,पुणे शहर अंतर्गत एमपीडीए कारवाई

### लोणी काळभोर पोलीस ठाणे परिसरात हातभट्टीवाल्या अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई

पुणे शहरातील लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गावठी हातभट्टी दारुचे गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **संजय नेहरु राठोड,वय-४५ वर्षे,रा.काळेशिवार,शिंदवणे,ता.हवेली,जि.पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने त्याच्या साथीदारांसह लोणी काळभोर पोलीस स्टेशनच्या हद्दीत **गावठी दारु तयार करणे, विक्री करणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०४ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास व जीवीतास धोका निर्माण होवून सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्या दहशतीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

लोणी काळभोर पोलीस स्टेशन यांनी सादर केलेला प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **श्री.रितेश कुमार,पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी** नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले असून, त्यास **अमरावती मध्यवर्ती कारागृह अमरावती** येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे. नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.दत्तात्रय चव्हाण,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणी काळभोर पोलीस स्टेशन,पुणे शहर व श्रीमती.वैशाली चांदगुडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणाया तसेच अवैध हातभट्टी दारु निर्मीती व विक्री करणाया अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा. पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही १९ वी कारवाई असुन**,यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.